आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१७ जून २०२४ - सोमवार

पश्चिम बंगालच्या न्यु जलपायगुडी स्थानकाजवळ सियालदाहला जाणाऱ्या कांचनजंगा एक्सप्रेसला मालगाडीनं पाठीमागून धडक दिल्यानं झालेल्या अपघातात आतापर्यंत ८ जणांचा मृत्यू झाल्याचं वृत्त असून या अपघातात ५० जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये ३ रेल्वे कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. घटनास्थळावरचं बचाव कार्य पूर्ण झाल्याची माहिती रेल्वे बोर्डाच्या अध्यक्ष जया वर्मा-सिन्हा यांनी दिली आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु , उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. या अपघातातल्या मृतांच्या कुटुंबाला प्रधानमंत्री मदत निधीतून २ लाख रुपये तर जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे.

रेल्वेकडून मृतांच्या कुटुंबाला १० लाख रुपये, गंभीर जखमींना अडीच लाख रुपये आणि किरकोळ जखमींना ५० हजार रुपये देण्याची घोषणा रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली आहे. अपघातग्रस्त लोकांच्या नातेवाईकांच्या मदतीसाठी रेल्वेनं वेगवेगळ्या स्थानकांवर मदतकक्ष सुरु केले आहेत.

**<><><><>**

वायव्य मुंबई मतदार संघातल्या निकालाला येत्या एक-दोन दिवसांत न्यायालयात आव्हान देणार असल्याचं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं म्हटलं आहे. अमोल किर्तीकर यांचा पराभव सरकारी यंत्रणेचा गैरवापर करून झाल्याचा आरोप करत मुंबईतल्या पत्रकार परिषदेत अनिल परब आणि आदित्य ठाकरे यांनी निवडणूक आयोगाच्या कारभारावर टीका केली.

या मतदार संघातील मतमोजणी सुरू असताना १८  व्या फेरीपर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी प्रत्येक फेरीमधील मतमोजणीची आकडेवारी जाहीर

करत होते. परंतु १९ व्या फेरीनंतर ते बंद केल्याचा दावा अनिल परब यांनी केला. मतमोजणी प्रक्रिया सुरू असताना तिथल्या अधिकाऱ्यांना वारंवार कुणाचे फोन येत होते, याची माहिती आपल्याकडे असून ती कोर्टात सादर करू, असंही परब यांनी सांगितलं. दरम्यान, निवडणूक आयोग भाजपच्या नियंत्रणात नसता तर भाजपच्या ४० जागा देखील आल्या नसत्या असा आरोप आदित्य ठाकरे यांनी यावेळी केला.

**<><><><><>**

अमरावती लोकसभा मतदारसंघात अनेक विकासकामं केलेली असतानाही महायुतीच्या उमेदवार नवनीत राणा यांच्या पराभव झाल्यानं त्याचं चिंतन आपण करत असल्याचं स्वाभीमानी पक्षाचे नेते, आमदार रवी राणा यांनी आज वार्ताहर परिषदेत सांगितलं. तसंच नवनीत राणा यांच्या पराभवामुळे अमरावती जिल्ह्याचा विकास वीस वर्षे मागे गेला असंही ते म्हणाले. महाविकास आघाडीने अपप्रचार, खोटी आश्वासनं, खोटी प्रलोभनं देऊन जनतेची दिशाभूल केली असा आरोपही राणा यांनी केला.

**<><><><><>**

सिक्कीमच्या पूरग्रस्त भागात अडकलेल्या सुमारे दोन हजार पर्यटकांना सुरक्षीतपणं बाहेर काढण्यास आज सकाळपासून सुरुवात झाली. पूरग्रस्त भागात अडकलेल्या सर्व प्रवाशांना रस्तेमार्गे बाहेर काढून त्यांना गंगटोकमध्ये आणण्यात येत असल्याची माहिती मंगन जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हेमकमार छेत्री यांनी दिली. हवामान खराब असल्यामुळे या प्रवाशांना हवाई मार्गानं आणता येत नसल्याचंही त्यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांची जालना जिल्ह्यातल्या वडीगोद्री इथल्या उपोषणस्थळी आज सरकारच्या शिष्टमंडळाने भेट घेतली. पालकमंत्री अतुल सावे, खासदार संदिपान भुमरे आणि माजी केंद्रीय राज्यमंत्री भागवत कराड यांनी आंदोलकांशी चर्चा करून त्यांना उद्याच्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीला येण्याचं आमंत्रण दिलं. मात्र, आपण स्वतः चर्चेसाठी येणार नसून आपलं शिष्टमंडळ पाठवू, असं आंदोलकांनी सांगितलं. दरम्यान, हाके यांच्या आंदोलनाची सरकारने दखल घ्यावी अशी मागणी भाजपाच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांनी केली आहे.

<><><><>

भारतीय जनता पार्टीनं विधानसभा निवडणुकीसाठी केंद्रीय मंत्री भुपेंद्र यादव यांची महाराष्ट्राचे निवडणूक प्रभारी म्हणून नियुक्ती केली आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव राज्याचे निवडणूक सहप्रभारी म्हणून काम पाहतील. हरियाणा, झारखंड, जम्मू आणि काश्मिर विधानसभा निवडणुकीसाठीही पक्षानं विविध केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री आणि माजी मुख्यमंत्र्यांची प्रभारी आणि सहप्रभारी म्हणून नियुक्ती केली आहे.

<><><><>

ईद उल अजहा हा सण देशभरात उत्साहाने साजरा होत आहे. देशाच्या विविध भागात आज ईदगाह तसंच मशिदीत नमाज अदा करुन एकमेकांना शुभेच्छा देण्यात आल्या. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांनी देशवासियांना ईदच्या शुभेच्छा दिल्या आहेत. ईद उल अजहा हा त्यागाचं स्मरण करण्याचा सण आहे, असं राष्ट्रपती मुर्मू यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. तर

ईदच्या निमित्तानं समाजात एकोपा आणि सुसंवाद वाढीला लागावा, अशा सद्भावना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केल्या आहेत.

**<><><><><>**

मुंबईत सुरु असलेल्या १८ व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आज 'सामाजिक परिवर्तन करण्याची माहितीपटांची क्षमता' या विषयावर चर्चासत्र झालं. दिग्दर्शक टी. एस. नागभरण यांची मुलाखत डी. रामकृष्णन यांनी घेतली. याशिवाय 'माहितीपटांमधलं निर्मितीमधून महिलांचं भावविश्व' या विषयावरही चर्चा सत्र झालं. याशिवाय विविध माहितीपट, लघुपट आणि ॲनिमेशनपट आज दाखवले जाणार आहेत.

**//<><><><><>//**